नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/02/2021 (रविवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मच्छीमार्केट जुना बसस्टाप येथे दिनांक 19/02/2021 चे 13.15 वा. ते 21.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सरला अरूण खैरकर, वय 45 वर्ष, रा. मच्छीमार्केट जुना बसस्टाप यांनी त्यांचे घराचे दाराला कुलुप लावुन भाजीपाला विक्री करीता आठवडा बाजार सावनेर येथे गेल्या होत्या. फिर्यादी या भाजीपाला विक्री करून 21.00 वा. घरी परत आल्यावर घराचे कुलुप उघडुन आत प्रवेश केले तेव्हा त्यांना स्वयंपाक खोलीचे बाजुचे दार उघडे दिसले. तसेच त्यांनी बेडरूममध्ये पाहिले तर लाकडी आलमारीतील ठेवलेले नगदी 1,28,700/–रू. व सोन्या–चांदीचे दागिने कि. 1,93,776/–रू. असा एकुण 3,22,466/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे दिसुन आले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मोरखेडे मो नं 9028748409 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 20/02/2021 चे 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– छाया श्रीक्रिष्ण गौरखेडे, वय 52 वर्ष, रा. परसोडी ता.कळमेश्वर या त्यांचे भाउजी नामे– अरूण गजभिये रा. खापरखेडा यांच्या घरी पाउनचाराकरीता व मुलाचे लग्नाचे सामान खरेदी करिता गेल्या होत्या. त्यादरम्यान फिर्यादी यांनी एका लहान पर्स मध्ये सोन्याचे दागिने कि. 72,500/–रू. चा मुद्देमाल हॅन्डबॅग मध्ये ठेवून खापरखेडा येथून मॅक्स गाडीने सावनेर येथील बसस्टॉप मध्ये उतरल्या. यानंतर फिर्यादी या गडकरी चौक सावनेर येथे पायदळ गेल्या असता त्यांना त्यांची बॅगची चेन उघडी दिसली. त्यादरम्यान अज्ञात आरोपीन फिर्यादीच्या बॅगमधुन सोन्या–चांदीचे दागिने किंमती 72,500/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नारायण बोरकर 9623871297 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर